**महाराष्ट्र शासन**

**सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,नागपूर**

**जुने मॉरिस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर-440001**

**Web : www.jdhengp.in**

E-Mail : jdhengp@rediffmail.com E-Mail : jdhengp@gmail.com

फोन.न. 0712-2561713 फॅक्सन. 0712-2554210

जा.क्र. ससंउशिनाग/अण्णा भाऊ साठे १ ऑ. जन्म दिवस सा/परिपत्रक 3515908/२०२६/ दिनांक.३१.०७.२०२६

**प्रति,**

**प्राचार्य, अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, व विज्ञान, विधी,**
**व समाजकार्य महाविद्यालये, नागपूर विभाग, नागपूर**

विषय : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्मदिन (दि. ०१ ऑगस्ट) "लेखन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याबाबत.

संदर्भ : 1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण- १०२६/प्र.क्र.७६/समन्वय, दिनांक २९ जुलै २०२६.
2. अण्णा भाऊ साठे १ ऑ जन्म दिवस सा/परिपत्रक/मवि-१/२०२६/ई-३०१६२३८, दि.३१.०७.२०२६

उपरोक्त विषयी संदर्भाकित शासन परिपत्रकान्वये, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने मराठी साहित्य विश्वात अमूल्य आणि भरीव असे योगदान दिले आहे. आपल्या लेखणीच्या जोरावर अण्णा भाऊ साठे हे साता समुद्रापार एक झुंझार लेखक म्हणून पोहचले, अशा जागतिक कीर्तीचे प्रतिभांवत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण म्हणून दिनांक ०१ ऑगस्ट, हा त्यांचा जन्म दिवस **"लेखन प्रेरणा दिन"** म्हणून साजरा केला जाणार आहे. त्याअनुषंगाने प्रतिभावंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण म्हणून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा ०१ ऑगस्ट हा जन्मदिवस उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये "लेखन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

या लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१. विद्यार्थ्यांना विविध विषय देवून विद्यार्थ्यांकरिता कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धाचे आयोजन करणे.
२. विविध विषयांवर वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा आयोजित करणे.
३. स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती, व्याख्याने आयोजित करणे.
४. ग्रंथ दिंडी आयोजित करुन ग्रंथलेखनाचे महत्व पटवून देणे.
५. अण्णा भाऊंच्या कथा, कादंबऱ्या, प्रवास वर्णन, लोकनाट्य तसेच शाहिरीचे विद्यार्थ्यांनी वाचन करणे.
६. अण्णा भाऊ साठे यांच्या व्यकितत्व आणि साहित्यिक कर्तृत्वावर व्याख्यानांचे आयोजन करणे.
७. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा तसेच साहित्य संमेलनांचे आयोजन करणे.

या अनुषंगाने नागपूर विभागातील सर्व संलग्नित महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था / राज्य सार्वजनिक विद्यापीठांना शासन परिपत्रकातील सूचनांनुसार "लेखन प्रेरणा दिन" उत्साहात व प्रभावीपणे साजरा करावा.

तसेच सदर उपक्रमास व्यापक प्रसिद्धीकरण करून विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा व आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमाचा अहवाल छायाचित्रांसह माहिती संचालनालयास सादर करावी.

Digitally signed by
SANTOSH WAGHUJI CHAVAN
Date: ... :06:31

**(डॉ. संतोष चव्हाण)**
सहसंचालक
उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर

प्रत :- मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांना माहितीस्तव सादर